MERC

# MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

**Office:** 13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400 005
**Tel.** 022 22163964/65/69, **E-Mail:** mercindia@merc.gov.in,
**Website:** www.merc.gov.in

**Advertisement No. 22/2020-21**

## PUBLIC NOTICE

**Case No. 249 of 2019**
**Inviting Comments on Application of the Tata Power Company Ltd. for amendment of Transmission Licence under Section 18 of the Electricity Act, 2003**

1. The Tata Power Company Ltd.-Transmission Business (TPC-T) has applied to the Maharashtra Electricity Regulatory Commission (the Commission) for the amendments to its Transmission Licence No. 1 of 2014 for reflecting the revised asset position on account of commissioning/decommissioning /modification to the Transmission Lines /Bays post grant of the Licence.
2. Amendments proposed under the Transmission Lines are as follows-
   - ➢ Changes in Transmission Line Length as compared to that provided in the Licence
   - ➢ Transmission Line in the "Proposed- List of Transmission Lines" to be shifted to "Existing Transmission Lines list" in the Transmission Licence post its commissioning
   - ➢ Addition of Transmission Line to Existing Transmission Lines list (which have not featured in the Transmission Licence)
   - ➢ Removal of Transmission Lines from "Existing Transmission Lines list"
   - ➢ Change of name of Transmission Lines in "Existing Transmission Lines list"
3. Amendment proposed under Transmission Bays are as follows-
   - ➢ Addition of Bays which were existing but were missed out in the Transmission Licence
   - ➢ Removal of Bays which were inadvertently considered as Transmission Bays in the Transmission Licence
   - ➢ Decommissioning of Transmission Bays
   - ➢ Shifting of existing bays from Tata Power- Generation and Tata Power – Distribution Business to Tata Power-T
   - ➢ To correct error in Technical Specifications / Nomenclature/ Number of Bays
4. TPC-T had published a Notice in (i) Indian Express (English), (ii) Financial Express (English) (iii) Loksatta (Marathi) and (iv) Saamana (Marathi) on 6 December, 2019, as required under Section 18(2) (a) of the Act inviting written suggestions or objections.
5. The State Transmission Utility (STU) vide its submission dated 6 November, 2019 has submitted the joint verification report where STU has verified the submissions of TPC-T for the Transmission bays in various receiving stations. Also STU vide its letter dated 10 January,2020 has submitted its recommendation to transfer the Assets from TPC-G and TPC-D to TPC-T .
6. After evaluation of the application and documents submitted by TPC-T, the Commission is prima facie satisfied that Transmission Licence No. 1 of 2014 granted to TPC-T may be amended, subject to fulfillment of the requirements laid down in the Electricity Act, 2003 and Regulations except for the amendments sought by TPC-T in respect of HPCL and BARC 110kV feeders (which is subject to outcome of separate proceedings of the Commission in Case No. 137 of 2016).
7. A copy of TPC-T's Application along with its Annexures and Enclosures can be accessed at the Commission's website **www.merc.gov.in** or inspected in person in the Commission's office in accordance with procedure laid down in MERC (Conduct of Business) Regulations, 2004.
8. In response to the Public Notice published, every person who intends to file suggestions/ objections can submit the same in English or Marathi language in writing through electronic means/Email: **ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in**, addressed to "The Secretary, Maharashtra Electricity Regulatory Commission, 13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai 400 005, **within 21 days from the date of publication of this Notice (Last Date: 27 January 2021 at 5 pm).** Suggestions and/or objections received after the specified date shall not be considered.
9. If the sender/objector who has submitted his commits/suggestions as per Para 8 above and wants to be heard in person in e-Public Hearing, then he should specifically mention the same at the time of filing of suggestions /objections. In such cases, submission of valid email ID and Mobile Number would be mandatory. The Commission at its sole discretion, may permit such sender/objector to be heard in the e-Public Hearing. All participants attending the e-Public Hearing shall follow the provisions of the Commission's Guidelines for attending Public Hearing Through Video Conference notified on 17 September, 2020.
10. E-Public Hearing to be held through video conference on **29 January, 2021 (Friday) at 10.30 hrs,** when TPC-T's application for amendment of Transmission Licence will be considered. No separate notice will be issued for the purpose.

**Date: 6 January, 2021**
**Place: Mumbai**

**Sd/-**
**Secretary, MERC**

**Size : 12 (W) x 22 (H)**

म वि नि आ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई–४०० ००५
**दूरध्वनी:** ०२२१६३९६४/२२१६३९६५ / २२१६३९६९
**संकेत स्थळ:** www.merc.gov.in **ई–मेल:** mercindia@merc.gov.in

**जाहिरात क्र. २२/२०२०–२१**

## जाहीर सूचना

**[सन २०१९ चे प्रकरण क्र. २४९]**
**टाटा पॉवर कंपनी लिमिटेडने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठी केलेल्या अर्जावर अभिप्राय मागविण्यासाठी**

१. टाटा पॉवर कंपनी लिमिटेड – पारेषण व्यवसाय (टीपीसी–टी) यांनी त्यांना परवाना मंजूर झाल्यानंतर पारेषण वाहिन्या/बेज कार्यान्वित केल्यामुळे/सेवेतून काढल्यामुळे/फेरबदल केल्यामुळे सुधारित मत्तेची स्थिती अद्ययावत करण्याकरिता त्यांच्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) अर्ज केला आहे.

२. पारेषण वाहिन्यांमध्ये प्रस्तावित केलेल्या सुधारणा खालीलप्रमाणे आहेतः
   - ➢ परवान्यामध्ये देण्यात आलेल्या पारेषण वाहिनीच्या लांबीच्या तुलनेत पारेषण वाहिनीच्या लांबीमध्ये बदल करणे.
   - ➢ प्रस्तावित – पारेषण वाहिन्यांच्या यादी मधील पारेषण वाहिनी कार्यान्वित झाल्यानंतर पारेषण परवान्यातील विद्यमान पारेषण वाहिन्यांच्या यादीमध्ये स्थलांतरित करणे
   - ➢ विद्यमान पारेषण वाहिन्यांच्या यादीमध्ये पारेषण वाहिनीची भर टाकणे (जे पारेषण परवान्यामध्ये समाविष्ट करण्यात आले नव्हते).
   - ➢ विद्यमान पारेषण वाहिन्यांच्या यादीमधून पारेषण वाहिन्या काढून टाकणे.
   - ➢ विद्यमान पारेषण वाहिन्यांच्या यादीमधील पारेषण वाहिन्यांच्या नावात बदल करणे.

३. पारेषण बेज अंतर्गत प्रस्तावित केलेल्या सुधारणा खालीलप्रमाणे आहेत –
   - ➢ अस्तित्वात असलेल्या परंतु पारेषण परवान्यामध्ये राहून गेलेल्या बेजची भर घालणे.
   - ➢ पारेषण परवान्यामध्ये अनवधनाने पारेषण बेज म्हणून विचारात घेतलेले बेज काढून टाकणे.
   - ➢ पारेषण बेज सेवेतून काढून टाकणे.
   - ➢ विद्यमान बेज टाटा पॉवर – निर्मिती आणि टाटा पॉवर – वितरण व्यवसाय मधून टाटा पॉवर – टी च्या व्यवसायात समाविष्ट करणे.
   - ➢ तांत्रिक वैशिष्ट्ये/परिभाषा/बेजच्या संख्या यामधील चुका दुरुस्त करणे.

४. टीपीसी–टी ने, अधिनियमाच्या कलम १८(२)(ए) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार लेखी सूचना किंवा हरकती मागविण्यासाठी (१) इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी), (२) फायनान्शिअल एक्सप्रेस (इंग्रजी), (३) लोकसत्ता (मराठी) आणि (४) सामना (मराठी) या वृत्तपत्रांमध्ये दि. ६ डिसेंबर, २०१९ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द् केली होती.

५. राज्य पारेषण कंपनीने (एसटीयु) दि. ६ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या निवेदनान्वये संयुक्त पडताळणी अहवाल सादर केला आहे, ज्यामध्ये एसटीयुने वेगवेगळया ग्रहन केंद्रांमधील पारेषण बेजसाठी एइएमएल – टी कडून सादर करण्यात आलेल्या निवेदनांची पडताळणी केली आहे. त्याशिवाय एसटीयुने दि. १० जानेवारी, २०२० च्या पत्रान्वये टीपीसी–जी आणि टीपीसी–डी कडून टीपीसी–टी कडे मत्ता हस्तांतरित करण्याची शिफारस केली आहे.

६. टीपीसी – टी ने सादर केलेल्या अर्जाचे आणि दस्तऐवजांचे विश्लेषण केल्यानंतर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, एइएमएल – टी यांना मंजूर केलेल्या पारेषण परवाना क्र. २०१४ चा १ मध्ये, विद्युत अधिनियम, २००३ आणि विनियमांमधील आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून तसेच एचपीसीएल आणि बीएआरसी ११० केव्ही फिडर्सच्या संबंधात टीपीसी–टीने मागणी केलेल्या सुधारणांचा अपवाद वगळून (ज्या सन २०१६ च्या प्रकरण क्र. १३७ मध्ये आयोगाच्या स्वतंत्र कार्यवाहीतील निकालाच्या अधीन आहेत), सुधारणा करता येईल.

७. टीपीसी – टी ने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्र आणि सहपत्रांसह आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत–स्थळावर किंवा कोणत्याही व्यक्तिला, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

८. प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तिंनी ही **सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून (अंतिम दिनांक : २७ जानेवारी, २०२१ सायं. ५.०० वाजेपर्यंत) २१ दिवसांच्या आत** त्यांच्या सूचना/हरकती, असल्यास, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई–४००००५ या पत्त्यावर इलेक्ट्रॉनिक माध्यम/ **ehearing@merc.gov.in/ secretary@merc.gov.in** ई–मेलद्वारे पाठवाव्यात. विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

९. वरील परिच्छेद ८ नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे जाहीर ई–सुनावणीमध्ये व्यक्तिशः आयोगासमोर मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई–मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई–सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. जाहीर ई–सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १७ सप्टेंबर, २०२० रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जाहीर सुनावणीस हजर राहण्यासाठी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींचे पालन करतील.

१०. **दि. २९ जानेवारी, २०२१ (शुक्रवार) रोजी १०.३० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या ई–सुनावणीमध्ये टीपीसी–टी च्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**दिनांक: ६ जानेवारी, २०२१**
**ठिकाण: मुंबई**

**सही/–**
**सचिव, मविनिआ**

**Size : 12 (W) x 22 (H)**